**सं.फौ.ख.क्रं. १६३२०/२०२१**
**बी ॲड बी परॅडाईस वि. देवराव**
**नि. क्रं. १९**

**<u>तक्रारदारचे  उलटतपास शपथेवर सुरू आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. नरेश शर्मा यांच्या कडुन</u>**

**९.** बी ॲड बी पॅराडाईस फर्म ही रजिस्टर फर्म नाही. बी ॲड बी पॅराडाईस पार्टनशिप डिड अभिलेखावर दाखल नाही. मी बी ॲड बी पॅराडाईस फर्म मध्ये पार्टनर आहे हे दाखविण्याकरीता अभिलेखावर कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाही. मागील ७ - ८ वर्षापासून बी ॲड बी पॅराडाईस फर्म हे प्लॉट विक्रीबाबत व्यवसाय करत आहे. मी आरोपीला अंदाजे १५ ते २० वर्षापासून ओळखत आहे. आरोपी हा अर्जनविस चा काम करतो हे दाखविण्याकरीता मी अभिलेखावर कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाही.

**१०.** बी ॲड बी पॅराडाईस फर्म यांनी मौजा बनवाडी येथे लेआउट प्रोजेक्ट सुरू करण्याबाबतचा कोणताही कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला रजिस्ट्री बाबतचे कागदपत्र  कोणत्या तारखेला दिले होते ती तारीख व कागदपत्रांचे वर्णन माझ्या तक्रारीत नमुद नाही. मी आरोपीला रजिस्ट्रीबाबत ७ कागदपत्रे दिले होते यासबंधीत कोणतेही लिखीत कागदपत्र मी अभिलेखावर दाखल केले नाही. साक्षदार स्वत:हून सांगतो की, आरोपी सोबत माझे अगोदर पासूनच व्यवहार आहे.

**११.** आरोपीने मला रू. ३,७५,०००/- ची मागणी केल्याबाबतचा कोणताही लिखीत स्वरूपाचा कागदपत्र नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, आरोपीने मौखिक मागणी केली होती. मी आरोपीला रू. ३,७५,०००/- दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला सदर रक्कम कशी दिली होती याबाबत माझ्या तक्रारीत नमुद नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की ती रक्कम नगदी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्लॉटच्या रजिस्ट्रीच्या वेळी स्टॅमप डयुटीची रक्कम ही साधारण प्लॉट खरेदीकरणारा देतो. हे म्हणणे खरे आहे की, प्लॉट खरेदी करीता जे काही खर्च लागते ते खर्च साधारणात: प्लॉट खरेदी करण्याऱ्याला दयावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, कोण कोणत्या प्लॉटच्या खरेदी करीता मी आरोपीला कागदपत्र व रक्कम  दिली होती हे माझ्या तक्रारीत नमूद नाही.

**१२.** मी आरोपीला कधी पैसे दिले होते ती तारीख मला आठवत नाही. मी आरोपीला

वारंवार वेगळ्या तारखेवर जावून पैश्याची मागणी केली होती. दि.१६.०५.२०१९ रोजी मी पोलिस स्टेशनमध्ये लिखीत तक्रार दिली होती. सदर तक्रारीचे छायांकित प्रत मी अभिलेखावर दाखल केलेली नाही. ज्यादिवशी आरोपीने मला चेक दिला होता त्यादिवशी आरोपीला अजनी पोलिस स्टेशनमध्ये बोलविले होते.

**प्रश्न :** पोलिस स्टेश्नमध्ये आरोपी व माझ्या मध्ये समजोता झाला होता यासंबंधीत कोणतेही लिखीत कागदपत्र करण्यात आले होते का?

**उत्तर :** लिखीत कागदपत्र करण्यात आले नव्हते परंतु आरोपीने समजोता झाला म्हणून मला चेक दिला होता म्हणून मी लिखीत कागदपत्र बनविले नव्हते.

**१३.** धनादेश (नि.क्र. CW1-P5) हे अनादरीत झाल्याबाबतचा अभिलेखावर कोणतेही कागदपत्र नाही. धनादेश (नि.क्र. CW1-P5) हे मी बॅकेत वठविण्याकरीता जमा केले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर धनादेश अनादरीत झाल्याबाबत मी आरोपीला कोणतीही लिखीत नोटीस दिली नव्हती.

प्रश्न : तुमच्या सांगण्याप्रमाणे तुम्ही आरोपीला रू३,७५,०००/- दिले होते परंतु धनादेश (नि.क्र. CW1-P5) हे रू.३,७५,४३०/- रूपयाचा आहे, या रक्कममध्ये फरक का आहे?

उत्तर : आरोपीकडे माझे जुने काही पैसे बाकी होते म्हणून त्याने मला रू.३,७५,४३०/-चेक दिला होता.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, मौजे बनवाडी हे ग्रामीण मध्ये येते. त्यावेळी तेथे विक्रीपत्र सुरू नव्हते परंतु पुर्ण स्टॅमप डयुटी भरून ॲगरीमेंट टू सेल(agreement to sale) ही पध्दत सुरू होती. त्यावेळी मौजे बनवाडी येथे लेआउट sanction नव्हते. प्रत्येक नोंदणीकृत करीता मी आरोपीला रू.५०००/- देत होतो.

**(तक्रार व आरोपी यांच्या वकीलांच्या तोंडी विनंतीनुसार उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब)**

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक : १६.१०.२०२५
नागपूर

सही/-

( जे.के. चैनानी )
१७ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नागपूर.